# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.04.2026** **वारः बुधवार**

1. जागतिक बाजारपेठेत विश्वासार्ह सेमीकंडक्टर पुरवठादार म्हणून भारताचं स्थान बळकट होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. जनगणना 2027च्या पहिल्या टप्प्यात विचारल्या जाणाऱ्या 33 प्रश्नांचा संच सरकारकडून जारी
3. नवीन आर्थिक वर्षात नवा प्राप्तीकर कायदा 2025 देशभरात आजपासून लागू; राज्यात रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ नाही
4. राज्य शासनाच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला आज सुरुवात
5. भगवान महावीर जयंती निमित्त राज्यभर विविध उपक्रमांद्वारे महावीरांना अभिवादन आणि
6. गडचिरोलीमध्ये 9 नक्षलवाद्यांची पोलिसांपुढे शरणागती

**<u>पीएम सेमीकंडक्टर</u>**

जागतिक बाजारपेठेत एक विश्वासार्ह सेमीकंडक्टर पुरवठादार म्हणून भारत आपली भूमिका बळकट करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधील साणंद इथल्या 'केन्स टेक्नॉलॉजी'च्या सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारताचा सेमीकंडक्टर उद्योग विविध राज्यांमध्ये बहरत असून असंख्य तरुणांसाठी नवीन संधी निर्माण करत आहे. या प्रयत्नांना आणखी व्यापक स्वरूप देण्यासाठी आम्ही आता 'सेमीकंडक्टर मिशन 2.0' वर काम करत आहोत, असं पंतप्रधानांनी सांगितलं.

**<u>जनगणना</u>**

सरकारनं आजपासून सुरू होत असलेल्या जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यात विचारण्यात येणारे 33 प्रश्न काल अधिसूचित केले. जगातील ही सर्वात मोठी जनगणना दोन टप्प्यात करण्यात येणार असून प्रथमच ती डिजिटल स्वरुपात केली जाणार आहे. ही जनगणना यापूर्वी झालेल्या जनगणनांपेक्षा वेगळी असल्याचं महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. पहिल्या टप्प्यात सुरुवातीला घरांची गणना आणि घरांचं सूचीकरण करण्यात येणार आहे. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. पहिल्या टप्प्याचा अवधी आजपासून 30 सप्टेंबरपर्यंत ठरवण्यात आला आहे. यामध्ये स्व-गणनेचाही समावेश असून स्व-गणना पोर्टल 16 भाषांमधून उपलब्ध असेल, असंही जनगणना आयुक्तांनी नमूद केलं.

**<u>पीएनजी मोहीम वाढ</u>**

देशभर पीएनजीच्या विस्ताराला सध्या आलेली गती कायम ठेवण्यासाठी सरकारनं राष्ट्रीय पीएनजी मोहीम 2.0 ची मुदत येत्या 30 जूनपर्यंत वाढवली आहे. तसंच घरगुती पीएनजी जोडण्या देण्याच्या कामालाही आणखी वेग देण्याचे निर्देशही सरकारनं शहर गॅस वितरण संस्थांना दिले आहेत. मार्च महिन्यात पीएनजीच्या तीन लाखांहून अधिक जोडण्या दिल्या असून त्यामध्ये घरं, व्यवसाय, वसतीगृहं, खानावळी आणि कॅन्टीनचा समावेश आहे, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं दिली. याशिवाय एक मार्चपासून दर दिवशी सरासरी 50 लाखांहून अधिक एलपीजी सिलिंडर वितरित करण्यात येत आहेत, असंही मंत्रालयाकडून सांगण्यात आलं. देशात पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि पीएनजीचा पुरेसा साठा असल्याचं देखील मंत्रालयानं काल पुन्हा एकदा स्पष्ट केलं. अफवांना आळा घालण्यासाठी पत्रकार परिषदा घेऊन खरी माहिती द्यावी असं आवाहन मंत्रालयानं राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं.

**अनुदान वितरण**

पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 15व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार अनुदानाला मंजुरी देऊन केंद्र सरकारनं निधी वितरित केला आहे. याअंतर्गत महाराष्ट्राला 2025-26 या आर्थिक वर्षासाठी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात 109 कोटी रुपयांहून अधिक रक्कम वितरित झाली आहे. या अनुदानामुळे गावपातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल आणि गरजेनुसार विकासकामं राबवता येतील.

**नवीन आर्थिक वर्ष**

नवीन आर्थिक वर्षाचा प्रारंभ आजपासून होत आहे. आजपासूनच देशात काही महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा आणि नियमांमधील बदल लागू होणार आहेत. कर प्रणाली अधिक सोपी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला नवा प्राप्तीकर कायदा 2025 आजपासून लागू होत आहे. ऑनलाइन व्यवहार अधिक सुरक्षित करण्याच्या उद्देशानं, रिझर्व्ह बँकेने सर्व डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी द्वि-स्तरीय प्रमाणीकरण अनिवार्य केलं आहे; हा नियमही आजपासून लागू होत आहे. 2026-27 या आर्थिक वर्षासाठी फास्टॅगच्या वार्षिक पासच्या शुल्कामध्ये करण्यात आलेले बदलही आजपासून लागू होणार आहेत.

**रेडी-रेकनर मुंबई**

नवीन आर्थिक वर्षात राज्यात रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे उद्यापासून लागू होणारे दर पूर्वीप्रमाणेच राहतील, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. दर जैसे थे असले तरी वार्षिक मूल्यदराच्या तक्त्यांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अनेक बदल केले आहेत. यामध्ये मंजूर प्रादेशिक आणि विकास योजनांची अंमलबजावणी, नवीन सर्व्हे नंबरची नोंद आणि गहाळ गावं किंवा गावांच्या नावातल्या दुरुस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**साहित्य अकादमी**

साहित्य अकादमीतर्फे 2025 या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेले विविध 24 भाषांसाठीचे साहित्य पुरस्कार काल नवी दिल्लीत प्रदान करण्यात आले. मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार, लेखक राजू बाविस्कर यांना, 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते बाविस्कर यांना सन्मानित करण्यात आले. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**माझं गाव आरोग्य संपन्न गाव**

राज्य शासनाच्या, 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला आजपासून सुरुवात होत आहे. ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा घरपोच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं हे अभियान राबवण्यात येणार आहे. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती या अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. गाव पातळीवर आरोग्याचं मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले असून, या निकषांच्या आधारे 70 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून पुरस्कार देण्यात येणार आहेत. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारनं 80 कोटी 75 लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

**हत्तीरोग निर्मूलन**

देशातून 2027 पर्यंत हत्तीरोगाचं निर्मूलन करण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट असून ते उद्दीष्ट पूर्ण करण्यात महाराष्ट्र शासनानं सक्रिय सहभाग घेतला आहे. या रोगाच्या निर्मूलनासाठी, ट्रिपल ड्रग थेरपी अर्थात तीन औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. राज्यात लातूर, धाराशीवसह एकूण अठरा जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात 55 लाख नागरिकांना या रोगावरील औषधोपचारांचा लाभ देण्याचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**महावीर जयंती**

जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांचा 2 हजार 625 वा जन्मकल्याण उत्सव काल राज्यात उत्साहानं साजरा करण्यात आला. या निमित्त पुणे, नाशिक, सांगली, रत्नागिरी, संभाजीनगर, धुळे यांसह बहुतेक सर्वच शहरांमध्ये सकल जैन समाजाच्यावतीनं शोभायात्रा काढण्यात आल्या. या शोभायात्रांमधून भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित विविध आकर्षक देखावे सादर करण्यात आले. तसंच या शोभायात्रांच्या माध्यमातून त्यांनी दिलेली सत्य, अहिंसेची शिकवण त्याचबरोबर अन्य सामाजिक संदेशही देण्यात आले. याशिवाय विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांचं आयोजन करूनही भगवान महावीरांना अभिवादन करण्यात आलं.

**पदभार-मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या नवीन आयुक्त अश्विनी भिडे यांनी काल भूषण गगराणी यांच्याकडून पदभार स्वीकारला. भिडे यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. अश्विनी भिडे भारतीय प्रशासकीय सेवेच्या 1995 च्या तुकडीतील अधिकारी असून त्या मुंबई महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त आहेत. भिडे यांनी मुंबई मेट्रो 3 म्हणजेच ॲक्वा लाईन सुरु करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**नक्षली-गडचिरोली**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत देशातील माओवादी चळवळीचा अस्त झाल्याची घोषणा केल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी काल एकंदर 30 लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या 9 नक्षलवाद्यांनी काल गडचिरोली पोलिसांपुढे शरणागती पत्करली. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी भारताचं संविधान देऊन त्यांचा सत्कार केला. या 9 जणांपैकी तिघे जण क्षेत्रिय समिती सदस्य होते. सध्या गडचिरोली जिल्ह्यात 6 सशस्त्र नक्षली शिल्लक आहेत. त्यातील एक जण गडचिरोली जिल्ह्याचा, तर अन्य पाच जण छत्तीसगडचे रहिवासी आहेत. मात्र, त्यांच्या कुठल्याही हालचाली गडचिरोली जिल्ह्यात दिसत नसल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं. या नक्षल्यांनी शरणागती पत्करावी, अन्यथा सशस्त्र कारवाईला सामोरे जावं लागेल, असा इशाराही नीलोत्पल यांनी दिला.

**विधी विद्यापीठ पदवीदान**

मुंबईमध्ये काल महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचा चौथा दीक्षांत समारंभ पार पडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि या विद्यापीठाचे कुलपती न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या प्रमुख उपस्थितीत 255 विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांच्या पदव्या प्रदान करण्यात आल्या.

**हवामान**

राज्याच्या विविध भागात गेल्या दोन दिवसात झालेल्या अवकाळी पावसाने पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. पुढचे दोन दिवस  कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.